# जनसेवा आणि प्रभूसेवा

(डॉ. रंजन केळकर)

*देवाने जगावर एवढी प्रीती केली की, त्याने आपला एकुलता एक पुत्र दिला, ह्यासाठी की, जो कोणी त्याच्यावर विश्वास ठेवतो त्याचा नाश होऊ नये तर त्याला सनातन जीवन प्राप्त व्हावे.* (योहान ३:१६)

हे बायबलमधील अतिशय महत्वाचे, लोकप्रिय आणि प्रसिद्ध असे वचन आहे. ख्रिस्ती धर्माचा आणि तत्वज्ञानाचा हा जणू सारांश आहे. आणि म्हणून येशू ख्रिस्ताचे अनुयायी ह्या पृथ्वीवरील जीवनापेक्षा सार्वकालिक जीवनाविषयी अधिक विचार करतात. त्यांचा असा दृढ विश्वास आहे की, अनंत, शाश्वत व सनातन असे हे जीवन त्यांच्याकरता परमेश्वराने राखून ठेवलेले आहे.

पण बायबल आपल्याला हेही सांगते की, परमेश्वर प्रेमळ आणि दयाळू असला तरी तो न्यायी आहे आणि म्हणून प्रत्येक व्यक्तीचा न्याय होणे अनिवार्य आहे. परमेश्वराची प्रीती जितकी अगाध तितका त्याचा न्याय कठोर आहे.

परमेश्वराच्या न्यायाचे एक उदाहरण म्हणून येशू ख्रिस्ताने सांगितले,

*जो कोणताही निकामी शब्द माणसं बोलतील त्याचा ते न्यायाच्या दिवशी हिशोब देतील.* (मत्तय १२:३७).

ह्या न्यायाच्या दिवसाचे नाट्यपूर्ण वर्णन प्रभू येशूने स्वतःच केले आहेः

*पण मनुष्याचा पुत्र आपल्या गौरवात येईल आणि त्याच्याबरोबर सर्व देवदूत येतील तेव्हा तो आपल्या गौरवी राजासनावर बसेल; आणि सर्व राष्ट्रं त्याच्यापुढं जमवली जातील. आणि मेंढपाळ जसा शेरडांतून मेंढरं वेगळी करतो तसा तो त्यांना एकमेकांतून वेगळे करील; आणि मेंढरांना आपल्या उजवीकडे पण शेरडांना डावीकडे ठेवील.*

*मग राजा आपल्या उजवीकडच्यांना म्हणेल, "या, माझ्या पित्याचे आशीर्वादित! तुमच्यासाठी जगाच्या स्थापनेपासून तयार केलेलं राज्य वतन घ्या. कारण मी भुकेला होतो आणि तुम्ही मला खायला दिलंत, मी तान्हेला होतो आणि तुम्ही मला प्यायला दिलंत; मी परका होतो आणि तुम्ही मला आत घेतलंत, उघडा होतो आणि तुम्ही मला वस्त्र पेहरवलंत, आजारी होतो आणि माझी भेट घेतलीत, अटकेत होतो आणि माझ्याकडे आलात."*

*तेव्हा नीतिमान त्याला उत्तर देऊन म्हणतील, "प्रभू, आम्ही कधी तुला भुकेला बघितलं आणि खायला दिलं, किंवा तान्हेला बघितलं आणि प्यायला दिलं? कधी तुला परका बघितलं आणि आत घेतलं, किंवा उघडा बघितलं आणि वस्त्र पेहरवलं? आणि कधी तुला आजारी किंवा अटकेत असता बघितलं, आणि तुझ्याकडे आलो?"*

*तेव्हा राजा त्यांना उत्तर देऊन म्हणेल, "मी तुम्हाला सत्य सांगतो, तुम्ही ते माझ्या भावांतल्या, ह्या लहानांतल्या एकाला, ज्याअर्थी केलंत, त्याअर्थी ते मला केलंत."*

*मग तो डावीकडच्यांना म्हणेल, "अहो तुम्ही शापित झालेले; सैतानासाठी आणि त्याच्या दूतांसाठी तयार केलेल्या सार्वकालिक अग्नीत माझ्यापुढून जा. कारण मी भुकेला होतो आणि तुम्ही मला खायला दिलं नाही, मी तान्हेला होतो आणि तुम्ही मला प्यायला दिलं नाही. मी परका होतो आणि तुम्ही मला आत घेतलं नाही, उघडा होतो आणि मला वस्त्र पेहरवलं नाही, आजारी आणि अटकेत होतो आणि माझी भेट घेतली नाही."*

*मग तेपण त्याला उत्तर देऊन म्हणतील, "प्रभू, आम्ही कधी तुला भुकेला किंवा तान्हेला, किंवा परका, किंवा उघडा किंवा आजारी किंवा अटकेत असताना बघितलं आणि तुझी सेवा केली नाही?"*

*तेव्हा तो त्यांना उत्तर देऊन म्हणेल, "मी तुम्हाला सत्य सांगतो, तुम्ही ते ह्या लहानांतल्या एकाला, ज्याअर्थी केलं नाही, त्याअर्थी ते मला केलं नाही."*

*आणि ते सार्वकालिक बंधनात जातील पण नीतिमान सार्वकालिक जीवनात जातील.* (मत्तय २५:३१-४६)

लहानांतल्या लहानाची सेवा ही प्रभूची सेवा आहे, आणि म्हणून जनसेवेला ख्रिस्ती धर्मात, ख्रिस्ती आचरणात फार महत्वाचे स्थान आहे.

एकदा येशूने त्याच्या शिष्यांना विचारले, *"तुम्ही वाटेत कसला वाद करीत होता?" आणि ते गप्प राहिले; कारण त्यांनी सर्वांत मोठा कोण असा वाटेत आपआपल्यात वाद केला होता. मग तो बसला व त्याने बारा जणांना बोलावले, आणि तो त्यांना म्हणतो, "जर कोणी मनुष्य पहिला होऊ इच्छीत असेल तर त्यानं शेवटला आणि सर्वांचा सेवक व्हावं."* (मार्क ९:३३-३५).

ख्रिस्ताच्या सांगण्याप्रमाणे जनसेवा करायची असेल तर ती स्वतःला सर्वांत शेवटचे स्थान देऊन केली पाहिजे.

हल्लीच्या दिवसांत आपण अनेकदा पाहतो की, समाजसेवा करायची झाली तर लोक प्रथम पत्रकार परिषद बोलावतात, आपल्यासमोर किती टी व्ही कॅमेरे आहेत हे आधी बघतात आणि मग प्रसिद्धीच्या प्रकाशात आपले कार्य सुरू करतात. पण ह्या संदर्भात, दोन हजार वर्षांपूर्वी, येशू म्हणाला होताः

*तुम्ही आपलं धर्माचरण मनुष्यांना दिसावं म्हणून त्यांच्यापुढं न करण्याची काळजी घ्या. नाहीतर, तुमच्या स्वर्गातील पित्याकडून तुम्हाला काही प्रतिफळ मिळणार नाही. म्हणून तू जेव्हा दान करतोस तेव्हा ढोंगी जसे सभास्थानांत आणि रस्त्यांत, त्यांना मनुष्यांकडून गौरव मिळावं म्हणून आपल्यापुढं शिंग वाजवतात तसं तू करू नको. मी तुम्हाला सत्य सांगतो, ते आपलं प्रतिफळ भरून पावले आहेत. पण तू जेव्हा दान करतोस तेव्हा तुझा उजवा हात करतो ते डाव्या हाताला कळू देऊ नको. म्हणजे तुझं दान गुप्तात व्हावं, आणि गुप्तात पाहणारा तुझा पिता तुला प्रतिफळ देईल.* (मत्तय ६:१-४)

तात्पर्य हे की, दानधर्म करून, लोकांची मदत करून, त्यांची वर वर सेवा करून, आपण परमेश्वराला खूष करू शकत नाही. स्वार्थाकरता, प्रसिद्धीकरता, आपल्याला काही परत मिळेल अशी आशा बाळगून केलेली जनसेवा ही प्रभूला मान्य नाही.

ख्रिस्ती धर्मानुसार, सनातन जीवन आपण विकत घेऊ शकत नाही. आपण कितीही जनसेवा केली तरी ती आपण आपल्या हिशोबी मांडू शकत नाही. परमेश्वराची सेवा हेच आपले आद्य ध्येय असले पाहिजे.

प्रभू येशूने हे अगदी स्पष्ट केले की,

*जो कोणीही मला "प्रभू, प्रभू," म्हणतो तो स्वर्गाच्या राज्यात येईल असं नाही. पण जो माझ्या स्वर्गातील पित्याच्या इच्छेप्रमाणे करतो तो येईल. त्या दिवशी पुष्कळ जण मला म्हणतील, "प्रभू, प्रभू, आम्ही नाही का तुझ्या नावानं संदेश दिले? तुझ्या नावानं भुतं काढली? आणि तुझ्या नावानं पुष्कळ चमत्कार केले?" आणि मग मी त्यांना उघड सांगेन, "मी तुम्हाला कधीच ओळखीत नव्हतो; अहो, अनाचार करणारे तुम्ही, माझ्यापुढून निघून जा."* (मत्तय ७:२१-२३)

प्रभू येशूची ही आज्ञा आहे की, आपण सर्वांनी प्रीती केली पाहिजे. तो म्हणतो, तुम्ही एकमेकांवर प्रीती करा, शेजाऱ्यांवर प्रीती करा, वैऱ्यांवरसुद्धा प्रीती करा. प्रभू येशू म्हणाला की,

*तुमची एकमेकांवर प्रीती असेल तर ह्यावरून सर्व ओळखतील की, तुम्ही माझे शिष्य आहा.* (योहान १३:३५)

प्रीतीविषयी संत पौल म्हणतो,

*मी मनुष्यांच्या आणि देवदूतांच्या भाषांत बोललो पण माझ्या ठायी प्रीती नसली, तर मी वाजणारी थाळी किंवा झणझणणारी झांज झालो. आणि माझ्यात संदेश देण्याची शक्ती असली, मला सर्व रहस्ये कळली व सर्व ज्ञान अवगत झाले, आणि, मला डोंगर ढळवता येतील इतका माझ्यात पूर्ण विश्वास असला, पण माझ्या ठायी प्रीती नसली, तर मी काही नाही. आणि माझी सर्व मालमत्ता मी गरिबांना अन्नदान करण्यास दिली व माझे शरीर जाळण्यास दिले पण माझ्या ठायी प्रीती नसली तर मला काही लाभ होत नाही.* (१ करिंथ १३:१-३)

दर वर्षी फेब्रुवारीच्या १४ तारखेला व्हॅलेन्टाइन्स डे साजरा करण्याची प्रथा हल्ली रूढ होत चालली आहे. पण प्रीती करायची असेल तर त्यासाठी वर्षात एका विशिष्ट तारखेची वाट बघत बसण्याची गरज नाही. ख्रिस्ती जीवन हे दर रोज जगायचे असते. वर्षात एक दिवस नाही, तर वर्षभर, आयुष्यभर जगायचे असते.

ख्रिस्ती जीवन हे एका अर्थी खरोखर कठिण आहे आणि एका अर्थी अगदी सोपेही आहे.

आपण ह्या पृथ्वीवर किती काळ जगतो हे सर्वस्वी परमेश्वराच्या हाती आहे. पण परमेश्वराच्या ह्या कृपादानाचा उपयोग आपण कसा करायचा, आपले जीवन कसे जगायचे, स्वतःचे हित पहायचे की इतरांचे, जनसेवा करायची की प्रभूसेवा, हे आपणच ठरवायचे असते. आपण योग्य निर्णय घ्यावा म्हणून आपण काळजी घेतली पाहिजे आणि पवित्र आत्म्याचे मार्गदर्शन घेतले पाहिजे. *"मी नाही तर ख्रिस्त माझ्या ठायी जगतो"* (गलती २:२०) ही संत पौलाची जीवनशैली आपणही अनुसरण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

.....................